# पुणे विद्यापीठ

परिपत्रक क्र.१९३/२०१३

## मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क वसूल न करणे बाबत

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती/भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग जातीच्या पात्र विद्यार्थ्यांना विहित अभ्यासक्रमासाठी सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांच्या मार्फत शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. तसेच इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रस्तावित शैक्षणिक शुल्क,परीक्षा शुल्क व इतर शुल्क ५०% दराने शासनाकडून प्रतिपूर्ती करण्यात येते. तथापि बऱ्याच शैक्षणिक संस्थांमार्फत सदरहू जातीच्या पात्र विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क वसूल करण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. जी महाविद्यालये अशा प्रकारे फी वसूल करतील त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात येईल असे शासनाने स्पष्ट आदेश दिलेले आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी वसूल करण्यात येऊ नये यासंदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार विद्यापीठाने सर्व शैक्षणिक विभाग व सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था यांना स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. सोबत विद्यापीठ परिपत्रक क्र. २९२/२००८ दि. ३०/०८/२००८, तसेच पत्र संदर्भ क्र शै. प्रवेश १३३९ दि. १६/०५/२०११ व शासनआदेशाच्या प्रती पुनःश्च माहितीसाठी जोडत आहे.

या परिपत्रकाद्वारे सर्व शैक्षणिक विभाग पुणे विद्यापीठ, सर्व संलग्नित अनुदानित आणि विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था यांना पुन:श्च सूचित करण्यात येते की, विद्यापीठाने ठरविलेल्या दरांप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाकडून शिक्षण शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, इतर शुल्क एक्स्ट्रा करिक्युलर अॅक्टीव्हीटीज, व परीक्षा शुल्क याची प्रतिपूर्ती होत असल्याने कोणत्याही परीस्थितीत मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून सदर शुल्क वसूल करण्यात येऊ नये/ आकारण्यात येऊ नये. शासन आदेशाचा भंग झाल्यास संबंधितास जबाबदार धरून नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७ )
संदर्भ : शै. प्रवेश/३०४५ )
दिनांक : 23/07/2013 )

23/7/2013
सहा.कुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :

मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक पदव्युत्तर विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे
मा. प्राचार्य/मा. संचालक सर्व संलग्नित महाविद्यालये व संस्था.